महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र
७०८ सदाशिव पेठ, कुमठेकर मार्ग, पुणे ४११०३०

संपर्क क्रमांक (०२०) २४४७ ६९३८ E-mail: itdept@maa.ac.in

जा.क्र. राशैसंप्रपम /आय.टी./परि.वेब.AMC/२४-२५/०४१२३ दिनांक : ०३/०९/२०२४

प्रति,

------------------------------

------------------------------

------------------------------

## दरपत्रक सूचना

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे या कार्यलयाच्या, www.maa.ac.in या संकेतस्थळाची वार्षिक दुरुस्ती व देखभाल करार (AMC) करण्यासाठी या प्रकारचे कामकाज करणाऱ्या नोंदणीकृत सेवा पुरवठादारांकडून खालील तक्त्यात दिलेल्या तपशीलास (प्ररुपात) अनुसरून दरपत्रके मागविण्यात येत आहेत,

| कामाचा तपशील<br>( www.maa.ac.in या संकेतस्थळाची वार्षिक दुरुस्ती व देखभाल करार (AMC) अंतर्गत आवश्यक कामकाज) | कामाची किंमत (GST शिवाय) | कामाची किंमत (GST सहित) |
|---|---|---|
| • Maintain - Responsive design, Mobile friendly UI and Creative navigation and link page design.<br>• Regular monitoring and maintenance of Website including Website Hosting with unlimited Web Space and Server, Bandwidth, Sub-domains, Regular Website Backup<br>• Security Updates & Monitoring - vulnerabilities and implementing security patches. websites software & plugins. SSL certificate management and renewal.<br>• CMS, Content Updates and Management & design - Keeping the CMS updated with the latest versions. Ensuring compatibility of themes and plugins with CMS updates. adding, updating, or removing website content when needed. content alignment | | |

| | | |
|---|---|---|
| with accessibility & SEO standards. Periodic reviews and updates to improve website design and user experience.<br>• Regular audits Search Engine Optimization.<br>• Monitoring & reporting website traffic & performance using tools.<br>• Compliance and Accessibility - Ensuring website complies with relevant regulations and standards and Regular audits and updates to maintain it.<br>• Regular Technical Support for all website related problems including Emergency Support for critical issues.<br>• Monthly Reports - Providing detailed reports on website performance, security, and maintenance activities. | | |
| एकूण रक्कम रु. अंकात (Numbers) | | |
| एकूण रक्कम रु. अक्षरात (Words) | | |

या कामासाठी इच्छुक पुरवठादारांनी आपली दरपत्रके खालील अटी आणि शर्तींच्या अधीन राहून, उपरोक्त उल्लेखित तपशीलानुसार प्रस्तुत परिषदेच्या www.maa.ac.in या संकेतस्थळाची वार्षिक दुरुस्ती व देखभाल करार (AMC) करण्यासाठी; सील बंद लिफाफ्यात परिषदेस दिनांक १०/०९/२०२४ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत प्रस्तुत परिषदेच्या आवक-जावक शाखेमध्ये आणून प्रत्यक्ष जमा करावीत.

**अटी आणि शर्ती**

(दरपत्रक सादर करताना खालील अटी आणि शर्तींचे काळजीपूर्वक वाचन करावे.)

१) दरपत्रके सील बंद लिफाफ्यात सादर करावीत. लिफाफ्यावर, www.maa.ac.in या संकेतस्थळाची वार्षिक दुरुस्ती व देखभाल करार (AMC) करण्यासाठी दरपत्रक असा उल्लेख करावा.

२) दरपत्रके विहित मुदतीत सादर करावे. मुदतीनंतर प्राप्त दरपत्रकांचा सदर प्रक्रियेसाठी विचार केला जाणार नाही.

३) सदर वार्षिक दुरुस्ती व देखभाल करार, विहित प्रक्रिया राबवून निवडलेल्या सेवा पुरवठादारस कार्यादेश दिल्याच्या दिनांकापासून १ वर्षाकरिता (२०२४-२५) लागू राहील.

४) दरपत्रक सादर करणाऱ्या अधिकृत संस्थेने स्वत:च्या लेटरहेड वर प्रमुखांच्या सही शिक्क्यानिशी दरपत्रक सादर करावे.

५) दरपत्रकासोबत पॅन कार्ड छायांकित प्रत, जीएसटी नोंदणी व नोंदणी प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक आहे.

६) उपरोक्त प्रारुपात कामाची किंमत नोंदवत असताना स्तंभ क्रमांक १, कामाचा तपशील मधील सर्व बाबींचा विचार करून एकूण किंमत त्या-त्या स्तंभात (GST शिवाय व सहित) नोंदवावी.

७) खाडाखोड असलेले, कामाच्या तपशीलात बदल केलेले किंवा अपूर्ण माहिती भरलेले दरपत्रक विचारात घेतले जाणार नाही.

८) दरपत्रकात नोंदविलेली एकूण रक्कम ही निवड झालेल्या सेवा पुरवठादारास सदर कामकाज समाधानकारकरित्या पूर्ण केल्यानंतर सदर कामासाठीची मान्य केलेली रक्कम ही कमाल रक्कम असेल व त्यामध्ये कोणताही बदल होणार नाही.

९) निवड झालेल्या सेवा पुरवठादाराने सदर कामकाज समाधानकारकरित्या पूर्ण केल्यानंतर सादर केलेले देयक हे प्रचलित नियमाप्रमाणे विहित शासकीय वजावटी करून अदा करण्यात येईल.

१०) अटी व शर्तींचा अधीन राहून किंवा अन्य कोणत्याही प्रकारे, केवळ दरपत्रक सादर केले म्हणजे उपरोक्त करारासाठी आपली निवड झाली असे मानले जाणार नाही.

११) उपरोक्त उल्लेखित कामकाजासाठी प्रक्रिया करत असताना, कोणत्याही टप्प्यावर सदर प्रक्रिया कोणत्याही प्रकारचे कारण न देता रद्द करण्याचे अधिकारी परिषदेकडे राखून ठेवण्यात येत आहेत.

१२) प्रस्तुत प्रक्रियेत कार्यादेश देईपर्यंत कोणत्याही अटी किंवा शर्तीमध्ये बदल करणे आवश्यक आहे असे परिषदेच्या लक्षात आल्यास तसा बदल करण्याचा अधिकार परिषदेकडे राखून ठेवण्यात येत आहेत.

१३) विहित प्रक्रिया राबवून निवड झालेल्या सेवा पुरवठादारस गुणवत्तापूर्ण व वेळेत सेवा देणे बंधनकारक असेल. तसे न झाल्यास सेवेतील किंवा गुणवत्तेतील कसूर करण्याचे स्वरूप लक्षात घेऊन देयक रकमेवर दंड आकारणे, देयक अंशात: अदा करणे किंवा कोणतेही देयक अदा न करता दिलेला कार्यादेश एकतर्फी रद्द करण्याचे अधिकार परिषदेकडे राखून ठेवण्यात येत आहे.

१४) सदर दरपत्रक परिषदेच्या www.maa.ac.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

(रमाकांत काठमोरे)
सहसंचालक
राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद,
महाराष्ट्र, पुणे